# एक दिवसाचे वेतन कोरोनासाठी द्या

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; प्राचार्यांसह शिक्षण संस्थांना केले आवाहन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर अधिकारी आणि कर्मचारी, अधिविभागांचे विभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, सर्व प्रशासकीय अधिकारी, सेवक यांनी कोरोना (कोव्हीड १९) विरुद्धच्या लढाईसाठी एक दिवसाचे वेतन मदत स्वरूपात मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी द्यावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज केले. त्याबाबतचे पत्रक प्रसिद्धीस दिले आहे.



डॉ. शिंदे म्हणाले, ''आपला देश आणि राज्य सध्या कोव्हीड-१९ कोरोना व्हायरसच्या अत्यंत गंभीर अशा संकटातून जात आहे. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन कोरोना व्हायरसचा (कोव्हीड-१९) प्रकोप रोखण्याकरिता कठोर प्रयत्न करत आहेत. या कठीण प्रसंगी देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे की, आपण आपल्या देशासाठी मोलाचे योगदान दिले पाहिजे. याच भावनेतून आपण सर्वांनी मिळून आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरिता देण्यात यावे. विद्यापीठाने विद्यापीठात शिव आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करून वेगळ्या आपत्तीवर मात करण्यासाठी प्रशिक्षण देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू केली आहे.''



विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार एक दिवसाचे वेतन देण्याबाबतही आवाहन केले आहे. तरी विद्यापीठाशी सर्व सबंधित घटकांनी एक दिवसाचे वेतन मदतीच्या स्वरुपात मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# विद्यापीठ संघाला मल्लखांबमध्ये कांस्यपदक

कोल्हापूर, ता. ३० : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रोप मल्लखांब स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने कांस्यपदक पटकावले. अमृतसर येथील गुरू नानक देव विद्यापीठात स्पर्धा झाली. संघ असा : पूजा मोरे (छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा), प्राजक्ता शिंदे (छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा), प्रणाली जगताप (किसन वीर महाविद्यालय, वाई), अस्मिता मांढरे (किसन वीर महाविद्यालय, वाई), निशा मोळके (व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी), शिरीन शेख (डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर). प्रशिक्षक डॉ. चंद्रकांत गिरी व व्यवस्थापक डॉ. जी. एस. मुल्लाणी यांचे मार्गदर्शन मिळाले.

# ‘शिक्षक, कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री निधीसाठी द्यावे’

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्थाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर अधिकारी आणि कर्मचारी तसेच विद्यापीठ अधिविभागांचे विभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक आणि सर्व प्रशासकीय अधिकारी, सेवक यांनी ‘कोरोना“ विरुद्धच्या लढाईसाठी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी द्यावे, असे आवाहन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, आपला देश कोरोना व्हायरसच्या गंभीर अशा संकटातून जात आहे. कठीणप्रसंगी देशासाठी योगदान देणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. राष्ट्रीय कर्तव्य म्हणून सर्वांनी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरिता द्यावे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षांच्या निर्देशानुसार एक दिवसाचे वेतन देण्याबाबतही आवाहन केले आहे.

तरुण भारत Tue, 31 March 2020
epaper.tarunbharat.com/c/5049: